# प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना



श्रुतिका भोयर
कृषि पदव्युत्तर पदवी विद्यार्थिनी
विस्तार शिक्षण विभाग
व. ना. म. कृ. वि., परभणी

आकांक्षा हूमने
आचार्य पदवी विद्यार्थिनी
कृषि किटकशास्त्र विभाग
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

प्रतिक रामटेके
आचार्य पदवी विद्यार्थी
मृदाशास्त्र व कृषी रसायनशास्त्र विभाग
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

देशातल्या मत्स्य व्यवसायात शाश्वत आणि जबाबदार विकासाच्या माध्यमातून निलक्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून या योजनेची अंबलबजावणी सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच आर्थिक वर्षामध्ये करण्यात येणार आहे

सदर योजना सप्टेंबर २०२० मध्ये राबविण्यात येत असून यासाठी केंद्र शासनाकडून ९,४०७ करोड रुपये आणि राज्य शासनाकडून ४,८८० करोड रुपये निधि उपलब्ध झाला असून त्यात लाभार्थींची हिस्सेदारी ५,७६३ करोड रुपये इतकी आहे.

**कार्यान्वयन अवधी-** वित्त वर्ष २०२०-२१ ते २०२४- २५ पर्यंत

**उद्देश-** मत्स्य पालन क्षेत्राच्या सतत आणि जवाबदेह विकासाच्या माध्यमातून देशात निली क्रांति प्रसार घडवून आणणे

**योजनेचे घटक:** या योजनेचे प्रामुख्याने दोन घटक आहेत- १) केंद्रीय क्षेत्र योजना २) केंद्रीय प्रायोजित योजना केंद्रीय प्रायोजित योजना ही तीन मुख्य श्रेणी लाभार्थी आणि गैर लाभार्थी उपघटकामध्ये वाटली गेली आहे.

१) उत्पादन आणि उत्पादकतेला प्रोत्साहन
२) अवसरचना आणि उत्पादनाच्यानंतर व्यवस्थापन
३) मत्स्य पालन व्यवस्थापन आणि नियामक फ्रेमवर्क

**योजनेचे आर्थिक पोषण:**

- क्षेत्र योजना – १०० % केंद्र सरकार द्वारे
- केंद्रीय प्रायोजित योजना – केंद्र आणि राज्याच्या मधले प्रमाण
  - पूर्व आणि हिमालयीन राज्ये – ९०:१०
  - इतर राज्ये - ६०:४०
  - केंद्र शासित प्रदेश – १०० % केंद्र सरकार द्वारे

**योजनेचे लाभार्थी:**

१) मच्छिमार, २) मासे उत्पादक शेतकरी, ३) मासे कामगार आणि मासे विक्रेते, ४) मत्स्यपालन विकास महामंडळ, ५) मत्स्यपालन क्षेत्रामधील बचत गट / संयुक्त देयता गट, ६) मत्स्यपालन सहकारी, ७) मत्स्यपालन महासंघ, ८) उद्योजक आणि खाजगी फर्म, ९) एफपीओ शेतकरी उत्पादक संघटना/कंपन्या, १०) SCs/STs/महिला/सक्षम व्यक्ति, ११) राज्य सरकार/UTs आणि त्यांच्या कंपन्या, १२) केंद्र सरकार आणि त्यांच्या कंपन्या, १३) राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड

**योजनेचा लाभ:**

- मत्स्य पालन क्षेत्रामधल्या गंभीर समस्यांना दूर करून त्याचा क्षमतेचा भरपूर वापर करणे
- मत्स्य पालन क्षेत्रामध्ये जवळपास ९% वार्षिक वाढीसोबतच २०२४-२५ पर्यंत २२ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादनाचे ध्येय साध्य केले जाऊ शकणार
- मत्स्य पालनासाठी चांगल्या व योग्य गुणवत्तेचे बीज प्राप्त होणार
- मासे पालनासाठी सरस आणि चांगल्या पाणी व्यवस्थापनाला प्राधान्य मिळणार
- मासे पालनासाठी आधुनिकीकरण सोबतच आवश्यक अवसंरचना आणि मजबूत वॅल्यू चैन विकसित केली जाणार
- शहरी आणि ग्रामीण भागातील मासे पालनामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपाने जुळणाऱ्या सगळ्या लोकांसाठी रोजगार आणि चांगली उत्पादन संधी उपलब्ध होणार
- मासे पालन क्षेत्रामध्ये प्रवेश आकर्षित करण्यास मदत मिळणार ज्यामुळे मासे उत्पादक बाजार आणि अधिक प्रतिस्पर्धी बनू शकणार
- वर्ष २०२४ पर्यंत मासे पालनाशी जुळणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट होण्यास मदत मिळणार
- मासे पालन क्षेत्र व यासंबंधी जुळणाऱ्या शेतकऱ्यांना आणि श्रमिकांना सामाजिक तसेच आर्थिक सुरक्षा मिळणार
- या योजनेअंतर्गत मासेमारी उत्पादन वाढवण्यासाठी नवीन ट्यांक निर्माण केले जाणार
- या सोबतच दुर्घटना विमा करिता विस्तारीत कवरेज च्या माध्यमातून सर्व शेतकरी कल्याण कार्यक्रम आणि सामाजिक सुरक्षा योजना कवरेज च्या माध्यमातून सर्व मासेमाऱ्यांना आणण्याची पुढची तरतूद या योजनेचा हिस्सा आहे
- याशिवाय मासेमाऱ्यांसाठी इतर शेतकरी आणि पशुपालकांसारखे लाभ दिले जाणार
- मत्स्य पालनासाठी पायाभूत सुविधा, उत्पादन, आधुनिकीकरण, मत्स्य सरचिंग टेक्निक, उत्पादकता, पैदावार प्रबंध आणि गुणवत्ता नियंत्रनावर विशेष भर दिल्या जाणार आणि त्यांचे प्रशिक्षण सुद्धा दिले जाणार
- अधिक माहितीसाठी fisheries.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

(संपर्क: +९१ ९५२७७६५३६३)

★ ★ ★